“महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाची स्थापना” या योजनेअंतर्गत ६ अस्थायी पदे सन २०१९-२० मध्ये पुढे चालू ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१०८/फ-९
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १८ मार्च, २०१९

वाचावे :-

१. शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. डब्ल्युएलपी०३.१८/प्र.क्र.११६/फ-१ दिनांक -२७.३.२०१८
२. शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. निसप-२०१८/प्र.क्र.४२३/फ-९ दिनांक -३.११.२०१८
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र कक्ष-३/योजनेतर/ प्र.क्र.५९/१८-१९/२०४८, दिनांक :- १४.२.२०१९.
४. शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक :- पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क दिनांक :- २१.२.२०१९

शासन निर्णय :-

“महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाची स्थापना” या योजनेअंतर्गत ६ अस्थायी पदांना सन २०१८-२०१९ मध्ये संदर्भ क्रमांक १ व च्या शासन निर्णयान्वये दिनांक ०१.०३.२०१८ ते दिनांक २८.०२.२०१९ पर्यत चालू ठेवण्यासाठी शासनाची मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. आता संदर्भ क्रमांक ३ च्या पत्रान्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी “महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाची स्थापना” या योजनेअंतर्गत ६ अस्थायी सन २०१९-२० मध्ये दिनांक ०१.०३.२०१९ ते २८.०२.२०२० पर्यंत चालू ठेवण्याबाबत प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर केला आहे.

२. प्रशासकीय विभागाच्या आकृतिबंधातील समाविष्ट असलेल्या अस्थायी पदांना तसेच यापूर्वी आढावा मंजूर केल्यानंतर निर्माण करण्यात आलेल्या परंतु त्यांचा समावेश आकृतीबंधात करण्यात आलेला नाही, अशा अस्तित्वात असलेल्या सर्व अस्थायी पदांना दिनांक ०१.०३.२०१९ ते दिनांक ३०.०९.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्याचे अधिकार वित्त विभागाच्या संदर्भ क्र. ४ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आले आहेत.

३. आता “महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाची स्थापना” या योजनेअंतर्गत ६ अस्थायी पदांना सन २०१९-२० मध्ये दिनांक ०१.०३.२०१९ ते दिनांक ३०.०९.२०१९ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

४. महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळकरीता वन विभागातील समयोजनाने / वर्ग करण्यात आलेल्या ६ अस्थायी पदांच्या आस्थापनेवर होणारा खर्च २४०६, वनीकरण व वन्य जीवन, ०२, पर्यावरणीय वनीकरण व वन्यजीवन ११०, वन्यजीवन संरक्षण (००) (२०) महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाची स्थापना (०१) (सर्वसाधारण) २४०६ ए०९६ या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० या आर्थिक वर्षात उपलब्ध होणाऱ्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक पदनि-/२०१६प्र/१६/८.क्र.आ.पु.क,.दि २१.२.२०१९ .नुसार महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक¬ २०१९०३१९१२१०३९५४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIRENDRA
RAMBAHAL TIWARI

Digitally signed by VIRENDRA RAMBAHAL TIWARI
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840e
c375cd62a646a64986631086810, postalCode=400032,
street=R AND F D,4TH FLOOR,MANTRALAYA,MUMBAI,
ou=FOREST DEPARTMENT, o=GOVERNMENT OF
MAHARASHTRA, cn=VIRENDRA RAMBAHAL TIWARI
Date: 2019.03.19 12:13:50 +05'30'

(वीरेंद्र तिवारी)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर,
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर,
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पूर्व नागपूर/पश्चिम मुंबई
४. व्यवस्थापकीय संचालक निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर
५. मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती
६. महालेखापाल-२ (लेखा परीक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता) मुंबई
७. फ-९ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ (निवडनस्ती).